


दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १५९ । किंमत - २ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) गुरूवार ०२ /०७/२०२६ । पान - ६




# नाशिक- पुणे रेल्वे हा संगमनेरच्या भवितव्याचा प्रश्न

## स्वार्थ बाजूला ठेवून सर्वपक्षीय संघर्षाची गरज

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - नाशिक-पुणे रेल्वेचा मूळ संगमनेर मार्गानेच जावा, ही संगमनेरसह अकोले, सिन्नर, उत्तर पुणे आणि नाशिक परिसरातील नागरिकांची अनेक दशकांपासूनची मागणी आहे. मात्र हा प्रस्तावित मार्ग बदलल्यानंतर हा प्रश्न केवळ विकासाचा न राहता राजकीय वादाचा विषय बनला आहे. संगमनेरच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरू शकणारा हा रेल्वे प्रकल्प वाचवण्यासाठी सर्वपक्षीय एकजूट अपेक्षित असताना, मार्ग कुणी बदलला, प्रयत्न कुणी केले, अडथळे कुणी निर्माण केले आणि श्रेय कुणाला मिळणार? यावरच राजकारण रंगताना दिसत आहे.




याहूनही गंभीर बाब म्हणजे, आता रेल्वेसाठी होणाऱ्या जनआंदोलनात नेतृत्व कोणाचे असावे? यावरच लोकप्रतिनिधींमध्ये मतभेद उघड होत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमधून आता एकच प्रश्न विचारला जात आहे - राजकारण मोठे की संगमनेरची रेल्वे?

अलीकडे आमदार अमोल खताळ यांच्या वक्तव्याची सोशल मीडियावर मोठी चर्चा सुरू आहे. यापूर्वी रेल्वे पळवून न्यायला ती नेहरू गार्डनमधली रेल्वे आहे का? असे म्हणणारे आमदार खताळ आता रेल्वेच्या प्रश्नावर सकारात्मक आणि आक्रमक भूमिका घेत असल्याचे दिसत आहे. त्यांच्या या भूमिकेचे अनेकांनी स्वागत केले आहे. मात्र, त्यांनी देखील या आंदोलनासाठी बाहेरच्या कुणाच्या खांद्यावर बंदूक न ठेवता सर्वांना सोबत घेऊन लढण्यासाठी प्रयत्न करावे. माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या नेतृत्वाची अपेक्षा काही जण व्यक्त करतात तर काही जण खा. अमोल कोल्हे यांनी नेतृत्व करावे असा आग्रह धरत आहे. त्यामुळे देखील या लढ्याची धार कमी होत आहे.

दरम्यान खासदार अमोल कोल्हे यांनी यापूर्वीपासूनच या रेल्वेसाठी आक्रमक भूमिका घेत जनआंदोलन सुरू केले आहे. आमदार सत्यजित तांबे यांनीही सुरुवातीपासून मूळ मार्गासाठी सातत्याने भूमिका मांडली आहे. माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनीदेखील आपल्या कार्यकाळात या रेल्वे मार्गासाठी मोठा पाठपुरावा केला होता. स्थानिक पातळीवरील अनेक लोकप्रतिनिधी रेल्वेच्या मूळ मार्गाचे समर्थन करत असले, तरी त्यांच्या भूमिकांमध्ये राजकीय समीकरणांचा प्रभाव असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.

या रेल्वे मार्गाचा सर्वाधिक फायदा संगमनेर, अकोले, सिन्नर, नारायणगाव, मंचर, खेड आणि संपूर्ण उत्तर पुणे व नाशिक परिसरातील लाखो नागरिकांना होणार आहे. उद्योग, शिक्षण, व्यापार, पर्यटन, रोजगार आणि वाहतूक या सर्वच क्षेत्रांना नवी गती मिळणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प कोणत्याही एका पक्षाचा किंवा एका नेत्याचा नसून संपूर्ण प्रदेशाच्या विकासाचा प्रश्न आहे. सामान्य नागरिकांचा सूर स्पष्ट आहे. संगमनेरची रेल्वे परत मिळवायची असेल, तर ती कोणाच्या झेंड्याखाली नव्हे तर सर्व लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन लढल्याशिवाय शक्य नाही.

आज परिस्थिती अशी आहे की, तांबे नको, थोरात नको, कोल्हे नको, खताळ नको, विखे नको अशा प्रकारचे छुपे राजकारण सुरू असल्याची भावना जनतेत आहे. प्रत्येकाला रेल्वे हवी आहे, पण श्रेय दुसऱ्याला मिळू नये, अशी मानसिकता या प्रश्नाच्या आड येत असल्याची टीका होत आहे. काही सामाजिक (पान २ वर)

# आदिवासी समाजाचा भव्य मोर्चा

## एकलव्य स्मारकासह विविध मागण्यांसाठी प्रशासनाला निवेदन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आदिवासी समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी संगमनेर शहरात आदिवासी समाजाच्या वतीने भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले. मोठ्या संख्येने समाजबांधव या मोर्चात सहभागी झाले होते. घोषणाबाजी करत तहसील कार्यालयावर धडक दिल्यानंतर महाराष्ट्राचे जलसंधारण मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पाठविण्यासाठी प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

निवेदनात संगमनेर येथे आदिवासी समाजाचे आराध्य दैवत वीर धनुर्धर निषादपुत्र एकलव्य यांचे भव्य स्मारक उभारण्याची प्रमुख मागणी करण्यात आली. अहिल्यानगर जिल्ह्यात सुमारे साडेतीन लाख आदिवासी लोकसंख्या असूनही एकाही तालुक्यात एकलव्य स्मारक नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली. संगमनेर तालुक्यात सुमारे ५० हजार आदिवासी समाज असल्याने येथेच पहिले एकलव्य स्मारक उभारण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली.

याशिवाय संगमनेर तालुक्यातील चंदनापुरी घाट येथे असलेल्या आद्य क्रांतीकारक वीर हनमंत नाईक यांच्या समाधीचे जतन व संवर्धन करण्यात यावे, समाधीस्थळाचा विकास करावा तसेच चंदनापुरी घाटाला वीर हनमंत नाईक (पान २ वर)

# बेकायदेशीर आयव्हिएफ, सोनोग्राफी, लिंग निदान कारणाऱ्यांवर आता मोक्का ?

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यात वाढत असलेली विनापरवाना ‘इन-व्हिट्रो फर्टिलायझेशन’ केंद्रे, बेकायदेशीर सोनोग्राफी आणि गर्भलिंग निदानाच्या गैरप्रकारांवर राज्य सरकारने आता अत्यंत कठोर पावले उचलण्याचे ठरवले आहे.

या गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या आणि रॅकेट चालवणाऱ्या गुन्हेगारांवर थेट ’महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा’ (मोक्का) लागू करण्यात येणार आहे. यासाठी आगामी अधिवेशनात कायद्यात आवश्यक तरतूद केली जाईल, अशी मोठी आणि महत्त्वपूर्ण घोषणा आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत केली. राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या आठवड्यातील कामकाजाची सुरुवात प्रश्नोत्तराच्या तासाने झाली. या काळात आरोग्य व्यवस्थेचे अनेक महत्त्वाचे मुद्दे गाजले.

समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी आणि इतर सदस्यांनी राज्यात बोकाळलेल्या विनापरवाना खतत्र केंद्रे आणि सोनोग्राफीच्या माध्यमातून होणाऱ्या गैरप्रकारांचा मुद्दा उपस्थित केला. रुग्णांच्या जिवाशी होणारा हा खेळ थांबवण्याची मागणी सदस्यांनी केली. यावर आरोग्यमंत्र्यांनी काही प्रमुख आश्वासने दिली. गर्भलिंग निदान आणि बेकायदेशीर खतत्रकेंद्रांच्या माध्यमातून चालणाऱ्या संघटित रॅकेटला आळा घालण्यासाठी विद्यमान कायदे अधिक कडक केले जातील. पुढील अधिवेशनात अशा गुन्हेगारांव मोक्का लावण्याची तरतूद केली जाईल.

P C P N D T (गर्भधारणापूर्व आणि प्रसूतिपूर्व निदान तंत्र) कायदा, तसेच खतत्र आणि सोनोग्राफी केंद्रांच्या कडक तपासणीसाठी आणि नियमनासाठी राज्यात एक ’विशेष कृती दल’ स्थापन करण्यात येईल. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या केंद्रांवर कठोर कारवाई केली जाईल.

# संगमनेरच्या प्रश्नांसंबधी आमदार खताळ यांनी विधान सभेत उठविला आवाज

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर -

संगमनेर शहर व तालुक्यातील रखडलेली विकासकामे, पाणीपुरवठा, रस्ते, नगरपालिकेतील कथित भ्रष्टाचार, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, कत्तलखाना तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर आमदार अमोल खताळ यांनी विधानसभेत पुरवणी मागण्यांवरील चर्चेदरम्यान सरकारचे लक्ष वेधले. संगमनेरच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध कामांना तातडीने मंजुरी देण्याची मागणी त्यांनी सभागृहात केली.

संगमनेर शहरासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत मंजूर झालेल्या २१ कोटी ७९ लाख रुपयांच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेचे काम अनेक वर्षांपासून रखडले असल्याचा मुद्दा उपस्थित करत संबंधित ठेकेदारावर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. सध्या योजनेची प्रगती केवळ ४५ टक्के असून वाढत्या लोकसंख्येचा विचार करून योजना पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर करावा, अशी मागणीही त्यांनी केली.

नगरपालिकेच्या कारभारावर टीका करत खताळ यांनी शहरातील शाळांची दुरवस्था, भुयारी गटार योजनेतील कथित भ्रष्टाचार, नाल्यांवरील अतिक्रमणे तसेच सुधारित विकास आराखडा तयार करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. शहरालगतच्या गावांचा नगरपालिकेत समावेश करून हद्दवाढ करण्याचाही मुद्दा त्यांनी सभागृहात मांडला.





संगमनेर नगरपालिकेकडे अद्याप सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प नसल्यामुळे प्रवरा व म्हाळुंगी नदीत दूषित पाणी सोडले जात असल्याचे सांगत त्यांनी हा गंभीर पर्यावरणीय प्रश्न उपस्थित केला. त्यामुळे नदी प्रदूषित होत असून नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन झाल्यामुळे नगरपालिकेला दंड भरावा लागत असून हा भार नागरिकांवर पडत असल्याने संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करून तातडीने सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारावा, अशी मागणी त्यांनी केली. शहराच्या हद्दीत आणि नदीलगत सुरू करण्यात आलेला कत्तलखाना शासनाच्या नियमावलीला धरून नसल्याचा आरोप करत तो कायमस्वरूपी बंद करण्यात यावा, (पान २ वर)









# धुमाळवाडीतील पिढ्यान् पिढ्यांचा बंद केलेला वहीवाटीचा रस्ता अखेर खुला



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्याच्या पठार भागातील डोळासणे गावाअंतर्गत असलेल्या धुमाळवाडी परीसरातील शिवरस्ता तहसिलदार यांच्या आदेशान्वये पोलिस प्रशासन व मंडळाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मंगळवार दिनांक ३० जुन रोजी खुला करण्यात आला. त्यामुळे तब्बल दीड वर्षांपासून गैरसोयीला सामोरे जाणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

धुमाळवाडी परीसरातील दत्तावाडीकडे जाणारा नांदूरखंदरमाळ, हिवरगाव पठार हा पिढ्यान् पिढ्यांचा वहीवाटीचा शिवरस्ता २९९चा २ या गट नंबरमध्ये गेल्या दिड वर्षांपूर्वी शेतकऱ्याने बंद केला होता .या रस्त्याने अनेक कुटुंबांची दैनंदिन ये जा होती तर शेकडो एकर जमीनीतील मालाची वाहतूकही याच रस्त्याने होत होती.सबंधित शेतकऱ्याने रस्ता अडवल्यामुळे शेतकऱ्यांचा शेतीमाल,शालेय विद्यार्थ्यांना ये जा करणे तसेच आजारी व्यक्तींना रुग्णालयात पर्यंत नेणे अवघड झाले होते. त्यानंतर शेतकऱ्यांनी चर्चेतून मार्ग काढण्यासाठी अनेक प्रयत्न केले मात्र रस्ता सुरु न झाल्याने शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयात धाव घेत तहसीलदार धिरज मांजरे यांच्यासमोर आपले गाऱ्हाणे मांडत रस्ता पुर्ववत सुरू करण्यासाठी रस्ता केस दाखल केली होती. त्यानंतर या केसचा निकाल लागून तहसीलदार यांनी रस्ता खुला करण्याचे आदेश डोळासणे मंडळाधिकाऱ्यांना दिले होते.मंगळवार दिनांक ३० जुन रोजी मंडळअधिकारी ज्ञानदेव बेल्हेकर, कोतवाल,आदिनाथ कोकाटे, पोलिस उपनिरीक्षक अजय कौटे, पोलिस हेड कॉन्स्टेबल एकनाथ खाडे महिला पोलिस कर्मचारी अमृता बेलोटे यांच्या उपस्थितीत रस्ता खुला करण्यात आला. अनेक दिवस अडवलेला रस्ता खुला झाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले असल्याची माहिती तुषार करंजेकर यांनी देत प्रशासनाचे आभार व्यक्त केले.

अगदी पिढ्यान् पिढ्या वहीवाट असलेला रस्ता अचानक दिड वर्षांपूर्वी बंद झाल्याने शेतकऱ्यांची मोठी अडचण निर्माण झाली होती.प्रशासनाने रस्ता खुला करुन दिल्यानंतर शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले होते तर कमल करंजेकर,अनिता करंजेकर,मंगल दुधवडे , रोहिणी दुधवडे,मच्छिंद्र केदार, ज्ञानदेव केदार, भाऊसाहेब दुधवडे, विकास करंजेकर आदींनी आपल्या व्यथा मांडत प्रशासनाचे आभार मानले.

# महावितरणचे आश्वासन, मांची हिल फाट्यावरील रास्ता रोको स्थगित

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील आश्वी परिसरातील वीज पुरवठ्याच्या गंभीर समस्यांवर महावितरण अधिकाऱ्यांसोबत सकारात्मक चर्चा झाली. अधिकाऱ्यांनी बहुतांश मागण्या मान्य करत लेखी आश्वासन दिल्याने बुधवारी (१ जुलै) मांचीहिल फाट्यावर होणारे 'रास्ता रोको' आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.

माजी पंचायत सदस्य सरुनाथ समिती उंबरकर आणि महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये सोमवारी (२९ जून) मांचीहिल येथे बैठक पार पडली. यावेळी संगमनेरचे उपकार्यकारी अभियंता मंगेश प्रजापती, जोर्वे विभागाचे सहायक अभियंता ए. आर. मेखे, आश्वीचे सहायक अभियंता ए. एस. विखे, संदीप सोनार यांच्यासह किशोर जऱ्हाड, रामभाऊ थोरात, अण्णासाहेब सारबंदे, जनार्दन उंबरकर, संतोष उंबरकर, शिवा भुसाळ, बाबासाहेब भुसाळ आणि परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतीसाठी चर्चेदरम्यान, दिवसा सहा तास पूर्ण दाबाने वीज पुरवठा करण्यासाठी महावितरणने दीड महिन्याची मुदत मागितली. वरंवडी येथील सौर ऊर्जा प्रकल्प ते आश्वी सबस्टेशन लाईन कार्यान्वित होताच दिवसा वीज पुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले. नैसर्गिक आणि तांत्रिक अडचणी वगळता गावठाण भागाला २४ तास सिंगल फेज अखंडित वीज देण्यासही कंपनीने सहमती दर्शवली. बाभळेश्वर ते आश्वी मुख्य लाईन आणि सबस्टेशनसाठी आवश्यक यंत्रसामग्री मिळवण्यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून पाठपुरावा करू, अशी ग्वाही सरुनाथ उंबरकर यांनी अधिकाऱ्यांना दिली.

उर्वरित मागण्या १५ ऑगस्टपूर्वी सोडवण्याचे ठोस लेखी आश्वासन मिळाल्याने आंदोलन सध्या स्थगित केले आहे. मात्र, आश्वासनांची वेळेत पूर्तता न झाल्यास १५ ऑगस्ट रोजी मांचीहिल फाट्यावर रास्ता रोको करण्याचा इशारा उंबरकर यांनी दिला आहे.

# मृदंग विशारद परीक्षेत महर्षी सांदिपनी गुरुकुलचे तीन विद्यार्थी उत्तीर्ण







युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर :- ज्ञानराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित महर्षी सांदिपनी गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या प्रतिष्ठेच्या 'मृदंग विशारद' परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. यंदा गुरुकुलचे तीन विद्यार्थी या कठीण परीक्षेत यशस्वी ठरले असून, गुरुकुलच्या यशस्वी परंपरेत आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेला आहे.

यामध्ये प्रतीक राजेंद्र भराडे, आकाश बाळासाहेब लेंभे आणि निखिल जनार्दन मेघळे या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत 'मृदंग विशारद' ही मानाची पदवी प्राप्त केली.

या यशामागे गुरुकुलचे संस्थापक व मार्गदर्शक ह.भ.प. राम महाराज पवळ (गुरुजी) यांचे अथक परिश्रम, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि संस्कारपूर्ण मार्गदर्शन असल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुकुलमध्ये अनेक विद्यार्थी मृदंग वादनाचे शास्त्रोक्त शिक्षण घेत असून, त्यातून सातत्याने गुणवंत कलाकार घडत आहेत.

**'मृदंग विशारद' घडविण्याची गौरवशाली परंपरा कायम**

४० हून अधिक 'मृदंग विशारद' घडविण्याचा मान -

महर्षी सांदिपनी गुरुकुलने ग्रामीण व शहरी भागातील शेकडो विद्यार्थ्यांना मृदंग वादनाचे प्रशिक्षण देत वारकरी परंपरेचा समृद्ध वारसा जपला आहे. विशेष म्हणजे, या गुरुकुलमधून आजपर्यंत ४० हून अधिक विद्यार्थ्यांनी 'मृदंग विशारद' ही प्रतिष्ठेची पदवी संपादन केली असून, हा गुरुकुलसाठी अभिमानास्पद टप्पा मानला जातो. येथून घडलेले अनेक मृदंगवादक राज्यभर तसेच देशातील विविध भागांत कीर्तन, भजन आणि धार्मिक कार्यक्रमांद्वारे वारकरी संस्कृतीचा प्रसार करत आहेत.

या उल्लेखनीय यशाबद्दल प्रतीक भराडे, आकाश लेंभे, निखिल मेघळे तसेच त्यांचे मार्गदर्शक ह.भ.प. राम महाराज पवळ (गुरुजी) यांच्यावर संगमनेर परिसरातील भजनी मंडळे, वारकरी संप्रदाय, पालक आणि नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# टीईटी पेपरफुटी प्रकरणी काँग्रेसचे सलग तिसऱ्या दिवशी आंदोलन

मुंबई (वृत्तसंस्था)

टीईटी पेपरफुटी प्रकरणी युवक काँग्रेस आक्रमक झाली असून सलग तिसऱ्या दिवशी आंदोलन करून भाजपा महायुती सरकारविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांच्या नेतृत्वाखाली युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी विधानभवनाच्या प्रवेश द्वारावर आंदोलन करत शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी राजीनामा देण्याच्या मागणीसाठी जोरदार घोषणाबाजी केली.

रविवारी होणाऱ्या टीईटीचा पेपर शनिवारी ठाण्यात फुटल्याने ही परीक्षा रद्द करावी लागली, यामुळे लाखो परिक्षार्थींचे नुकसान झाले आहे.



भारतीय जनता पक्ष महायुतीचे सरकार एक परिक्षाही व्यवस्थित घेऊ शकत नाही. सातत्याने पेपर फुटत असून प्रामाणिक विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होते आहे. मागील महिन्यात नीटचा पेपर फुटल्याने देशभरातून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत असतानाच टीईटीचाही पेपर फुटल्याने सर्वत्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. काँग्रेस पक्षाने पेपरफुटीप्रकरणी आक्रमक भूमिका घेत भाजपा सरकारला सळो की पळो करून सोडले आहे. काल रात्री सागर साळुंखे यांच्या नेतृत्त्वाखाली काँग्रेसची विद्यार्थी संघटना छडणख ने शिक्षणमंत्री दादा भुसे यांची गाडी अडवून काळे झेंडे दाखवण्यात आले, त्याआधी रविवारी मुंबई युवक काँग्रेस अध्यक्षा झीनत शबरीन यांच्या नेतृत्त्वाखाली शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या सरकारी निवासस्थावर हल्लाबोल केला. आणि आता पुन्हा युवक काँग्रेसने आंदोलन केले आहे. शिक्षणमंत्री दादा भुसे यांचा राजीनामा घेतल्याशिवाय हे आंदोलन थांबणार नाही, असा इशारा युवक काँग्रेसने दिला आहे.

# बस-ट्रकची धडक, ८ ठार, ६ जिवंत जळाले

दौसा (वृत्तसंस्था)

राजस्थानच्या दौसा जिल्ह्यात दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गावर स्लिपर बस आणि ट्रकच्या धडकेत सहा प्रवाशी जिवंत जळाल्याची घटना आज (१ जुलै) पहाटेच्या सुमारास घडली. अपघातानंतर दोन्ही वाहनांना आग लागल्याने मोठी जिवितहानी झाली. या अपघातात आतापर्यंत आठ जणांचा मृत्यू झाला आहे. दौसाचे पोलीस अधीक्षक पियुष दीक्षित यांनी सांगितले की, हा अपघात पहाटे अडीचच्या सुमारास कोलवा पोलीस ठाण्याच्या हद्दीत झाला. बस ऋषिकेशहून इंदूरकडे जात होती. मिळालेल्या माहितीनुसार, अपघातात २१ जण जखमी झाले असून त्यांना दौसा जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.लागल्याने हा अपघात झाल्याचा पोलिसांना संशय आहे. द्रुतगती मार्गावर लावलेल्या कॅमेऱ्यांचीही तपासणी केली जात आहे. अपघाताच्या आधारावर, बस खूप जास्त वेगाने धावत असल्याचा संशय आहे.

एसपी पियुष दीक्षित यांनी सांगितले की, स्लीपर बस ऋषिकेशहून इंदूरला जात होती. दौसा जिल्ह्यातील तनवड येथील झिरो पॉईंटवर हा अपघात झाला. भाजल्यामुळे पाच जणांचा आणि डोक्याला गंभीर दुखापत झाल्यामुळे दोघांचा मृत्यू झाला. आतापर्यंत नऊ जखमींची ओळख पटली आहे. अपघातस्थळाजवळील सुमेरकला गावातील रहिवासी महेंद्र नगर म्हणाले, जेव्हा मी घटनास्थळी पोहोचलो, तेव्हा रुग्णवाहिका किंवा अग्निशमन दल आले नव्हते. मी स्वतः रुग्णवाहिकेला फोन केला. अग्निशमन दल वेळेवर आले नाही. जर ते वेळेवर आले असते, तर आग आटोक्यात आणता आली असती. बसचा सामान ठेवण्याचा कप्पा सिगारेटच्या पाकिटांनी भरलेला होता.

## पान 1 वरून - आदिवासी समाजाचा भव्य मोर्चा...

पान १ वरून - यांचे नाव देण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली. स्वातंत्र्यलढ्यात इंग्रजांविरुद्ध शौर्याने लढणारे वीर हनमंत नाईक हे आदिवासी समाजाचे प्रेरणास्थान असून त्यांच्या कार्याला योग्य न्याय मिळावा, अशी भावना समाजबांधवांनी व्यक्त केली.

तसेच संगमनेर तालुक्यात आदिवासी समाजासाठी कायमस्वरूपी भव्य सभागृह उपलब्ध करून देण्यात यावे, जेथे सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व पारंपरिक कार्यक्रम, लोककला, हस्तकला, नृत्य, वेशभूषा, कृषी व आयुर्वेदाशी संबंधित उपक्रम आयोजित करता येतील, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली. या मागण्या आदिवासी समाजाच्या अस्मिता, इतिहास आणि सांस्कृतिक जतनाशी निगडित असल्याने शासनाने त्याची तातडीने दखल घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा मोर्चेकऱ्यांनी व्यक्त केली. मागण्या मान्य झाल्यास संपूर्ण आदिवासी समाज शासनाचा ऋणी राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले. यावेळी संजय बर्डे, प्रितेश माळी, गोरख पवार, अंकुश पवार, राकेश माळी, सोमनाथ शिंदे, महेश शिंदे, विकास शिंदे, सुनील वाघ, राहुल दळवी, अमोल माळी, नगरसेविका साक्षीताई सूर्यवंशी, ॲड. शिवाली सूर्यवंशी यांच्यासह अनेक आदिवासी बांधव उपस्थित होते.

# वीजेशिवाय थंडावा देणारे 'नेस्कोड' तंत्रज्ञान




सध्याच्या वाढत्या उष्णतेमुळे घर, कार्यालये आणि व्यावसायिक ठिकाणी एअर कंडिशनरचा (एसी) वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मात्र, एसीमुळे वीजेचा वापरही प्रचंड प्रमाणात होतो. जागतिक स्तरावर एकूण वीज वापरापैकी सुमारे १० टक्के वीज केवळ एसी चालवण्यासाठी खर्च केली जाते. वाढते वीजबिल, ऊर्जा संकट आणि पर्यावरणावरील परिणाम लक्षात घेता शाश्वत आणि कमी खर्चिक थंडावा देणाऱ्या तंत्रज्ञानाची गरज निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर संशोधकांनी विकसित केलेले 'नेस्कोड' (NESCOD - No Electricity Sustainable Cooling on Demand) तंत्रज्ञान विशेष चर्चेत आले आहे.

हे तंत्रज्ञान King Abdullah University of Science and Technology येथील संशोधकांनी विकसित केले आहे. या प्रणालीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ती थंडावा निर्माण करण्यासाठी विजेचा वापर करत नाही. त्यामुळे वीजबिलाचा भार कमी होण्यास मदत होते आणि पर्यावरणालाही कोणतीही हानी पोहोचत नाही.

नेस्कोड तंत्रज्ञानामध्ये अमोनियम नायट्रेट या रसायनाचा वापर करण्यात आला आहे. हेच रसायन प्रामुख्याने खतांच्या निर्मितीसाठी वापरले जाते. या तंत्रज्ञानाचा आधार एंडोथर्मिक अर्थात उष्णताशोषक रासायनिक प्रक्रियेवर आहे. अमोनियम नायट्रेट पाण्यात विरघळल्यावर ते आसपासच्या वातावरणातील उष्णता शोषून घेते. परिणामी तापमानात लक्षणीय घट होते आणि नैसर्गिकरीत्या थंडावा निर्माण होतो.

संशोधकांनी केलेल्या प्रयोगांमध्ये या तंत्रज्ञानाची प्रभावीता स्पष्ट झाली आहे. अमोनियम नायट्रेट आणि पाण्याच्या मिश्रणामुळे अवघ्या २० मिनिटांत तापमान २५ अंश सेल्सिअसवरून ३.९ अंश सेल्सिअसपर्यंत खाली आले. विशेष म्हणजे, ही प्रक्रिया पार पाडण्यासाठी कोणत्याही मोटर, कंप्रेसर किंवा विद्युत उपकरणांची आवश्यकता भासली नाही. त्यामुळे कमी खर्चात आणि कमी साधनांमध्ये थंडावा मिळवणे शक्य झाले.

या तंत्रज्ञानाचा आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे त्याची पुनर्वापरक्षम रचना. एकदा अमोनियम नायट्रेटचे द्रावण तयार झाल्यानंतर थंडावा निर्माण होतो. त्यानंतर सौरऊर्जेच्या मदतीने हे द्रावण गरम केले जाते. पाण्याची वाफ झाल्यावर अमोनियम नायट्रेटचे स्फटिक पुन्हा वेगळे होतात. या स्फटिकांमध्ये पुन्हा पाणी मिसळून थंडावा निर्माण करता येतो. अशा प्रकारे ही प्रक्रिया सातत्याने सुरू ठेवता येते.

ऊर्जा बचत, पर्यावरण संरक्षण आणि कमी खर्चात प्रभावी थंडावा या वैशिष्ट्यांमुळे नेस्कोड तंत्रज्ञान भविष्यात एसीला सक्षम पर्याय ठरू शकते. वाढत्या तापमानाच्या काळात हे तंत्रज्ञान शाश्वत आणि हरित जीवनशैलीसाठी महत्त्वाची दिशा देणारे ठरणार आहे.

## पान 1 वरून - संगमनेरच्या प्रश्नांसंबधी आमदार...

अशी मागणीही त्यांनी केली. या कत्तलखान्यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा आणि पर्यावरणाचा प्रश्न निर्माण झाल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या कुंभमेळयाच्या पार्श्वभूमीवर संगमनेरमधून मोठ्या प्रमाणावर भाविकांचा प्रवास होणार असून अनेक दिंड्यांचा मुक्काम शहरात होत असल्याने आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष निधी मंजूर करण्याची मागणीही त्यांनी केली.

तालुक्यातील रस्त्यांच्या दुरवस्थेवरही खताळ यांनी आवाज उठवला. आशापीर बाबा देवस्थान-चिंचोली गुरव-नान्नज दुमाला-सोनोशी-मालदाड-संगमनेर, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६० ते गुंजाळवाडी-राजापूर-निमगाव भोजापूर, रणगाववाडी फाटा-रणखांब-देरेवाडी-कुंभारवाडी-वरवंडी तसेच संगमनेर-कोपरगाव या प्रमुख मार्गांचे रुंदीकरण, मजबुतीकरण आणि दुरुस्तीसाठी निधी मंजूर करण्याची मागणी त्यांनी केली. कृषी, व्यापार, शिक्षण आणि धार्मिक पर्यटनासाठी हे रस्ते अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

याशिवाय व्हीआयपी शासकीय विश्रामगृहाचे नूतनीकरण, नवीन सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय, कर्मचारी व न्यायाधीशांसाठी शासकीय निवासस्थाने, भूमी अभिलेख कार्यालयाचे विस्तारीकरण या मागण्याही त्यांनी सरकारसमोर मांडल्या.

कोल्हार-घोटी मार्गावरील रस्त्याची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाल्याचा मुद्दा उपस्थित करत संबंधित ठेकेदाराविरुद्ध जोखीम व खर्च तत्त्वावर कारवाई करून आवश्यक असल्यास नव्याने निविदा काढून रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणीही आमदार खताळ यांनी केली. संगमनेरच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या या सर्व मागण्या शासनाने तातडीने मंजूर करून नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी अपेक्षा आमदार अमोल खताळ यांनी विधानसभेत व्यक्त केली.

## पान 1 वरून - नाशिक- पुणे रेल्वे हा संगमनेरच्या...

संघटनाही स्वतंत्र भूमिका घेत असल्याने संघर्षाची ताकद विखुरली जात असल्याची खंत व्यक्त केली जात आहे. नाशिक-पुणे रेल्वे हा केवळ वाहतुकीचा प्रकल्प नाही; तो संगमनेरच्या पुढील अनेक दशकांच्या विकासाचा पाया आहे. आज जर हा मार्ग कायमचा दुसरीकडे गेला, तर भावी पिढ्यांना त्याची मोठी किंमत मोजावी लागू शकते. त्यामुळे हा प्रश्न राजकीय प्रतिष्ठेचा नव्हे, तर जनतेच्या हक्काचा म्हणून लढला गेला पाहिजे.

सध्या संगमनेरचे नेतृत्व दोन युवा नेत्यांकडे आहे. त्यांच्या पुढे मोठा राजकीय कालावधी आहे. अशा वेळी वैयक्तिक मतभेद, राजकीय डावपेच आणि श्रेयवाद बाजूला ठेवून संगमनेरच्या विकासासाठी सर्वपक्षीय नेतृत्वाने एकत्र रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याची हीच योग्य वेळ आहे.

जनतेचाही संदेश स्पष्ट आहे - नेत्यांनी स्वार्थ बाजूला ठेवून एकदिलाने लढा उभारला, तर संगमनेरकर त्यांच्यामागे खंबीरपणे उभे राहतील.

नाशिक-पुणे रेल्वे मार्ग ही आजच्या काळाची गरज आहे. तो संगमनेरच्या भवितव्याचा, आर्थिक प्रगतीचा आणि भावी पिढ्यांच्या विकासाचा मार्ग आहे. त्यामुळे आरोप-प्रत्यारोप, श्रेयवाद आणि राजकीय अहंकार बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र येणे हीच काळाची गरज आहे. अन्यथा इतिहासात अशी नोंद होईल की, राजकीय कुरघोड्यांमुळे संगमनेरच्या विकासाची रेल्वे कायमची दुसऱ्या मार्गाने निघून गेली.

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# डॉ. नुसरत सय्यद जीवन गौरव पुरस्कार सोहळा उत्साहात

## विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा गौरव; सामाजिक ऐक्याचा संदेश देणारा उपक्रम



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर साहित्यिक मंडळ व जवाहरलाल नेहरू उर्दू सेंटर, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित डॉ. नुसरत सय्यद जीवन गौरव पुरस्कार - २०२६-२०२७ पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. जवाहरलाल नेहरू उर्दू सेंटरच्या यशस्वी चौदा वर्षांच्या वाटचालीनिमित्त आयोजित या कार्यक्रमाला साहित्य, शिक्षण, सामाजिक, पत्रकारिता आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिल सोमणी यांनी केले. यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. संस्कार साधना पुरस्कार हा सुवर्णाकाकी मालपाणी (अध्यक्ष, शारदा शिक्षण संस्था, संगमनेर) यांना प्रदान करण्यात आला.

डॉ. नुसरत सय्यद जीवन गौरव पुरस्कार यंदा प्रा. रामचंद्र कमलाकर सर (माजी प्राध्यापक, बी.एड. कॉलेज, संगमनेर), मुश्ताक उस्मान कलादगी सर (माजी प्राचार्य, ग्लो उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, संगमनेर), फजलोद्दीन कासम शेख सर (माजी प्राचार्य, श्री भाऊसाहेब सं. थोरात विद्यालय, कनोली) तसेच प्रभावती शंकर देशपांडे (माजी प्राथमिक शिक्षिका, जोर्वे) यांना प्रदान करण्यात आला. डॉ. नुसरत सय्यद विशेष पुरस्कार अरविंद गाडेकर, हिरालाल पगडाल, अनिल भाऊ देशपांडे (अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, संगमनेर) आणि शेख गफ्फार बशीर (प्राचार्य, सह्याद्री इंटरनॅशनल स्कूल, शिबलापूर) यांना प्रदान करण्यात आला.

यावेळी ग्रेट अचिव्हमेंट पुरस्कार डॉ. तल्हा फय्याज बेग (एम.बी.बी.एस.), डॉ.शोयब मोहम्मद, श्रीरामपूर (कॉलेज ऑफ सायन्स किंग सऊद युनिव्हर्सिटी रियाज सऊदी अरब),डॉ. जुवेरिया हबीब शेख (बी.एच.एम.एस.), शेख मुज़म्मील गुलाम, मुंबई (बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स), मोमीन एम. आर. (बी.बी.ए.) आणि अमोल मतकर यांना प्रदान करण्यात आला.

याच कार्यक्रमात व्हॉईस ऑफ मीडिया या आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेच्या विविध विंगच्या अध्यक्षपदी संगमनेरचे अमोल मतकर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. बाबा खरात होते. प्रमुख अतिथी दैनिक युवावार्ताचे संस्थापक किसन भाऊ हासे आणि प्रमुख पाहुणे हिरालाल पगडाल यांनी मार्गदर्शन केले.

प्रमुख पाहुणे हिरालाल पगडाल यांनी आपल्या भाषणात डॉ. नुसरत असिफ अली सय्यद यांच्या सआदत हसन मंटो यांची सामाजिक जाणीव आणि राजकीय विचारधारा या संशोधनग्रंथाचे विशेष कौतुक केले. कर्करोगासारख्या असाध्य आजाराशी झुंज देत त्यांनी केलेले हे संशोधन अत्यंत मौलिक असून त्यांच्या निधनानंतर हा शोधनिबंध पुस्तकाच्या स्वरूपात प्रकाशित झाला, ही बाब प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जवाहरलाल नेहरू यांच्या विचारधारेप्रमाणे सर्वधर्म समभाव, सामाजिक ऐक्य आणि बंधुभाव जपणारा हा कार्यक्रम असल्याचे नमूद करून आयोजकांचे अभिनंदन केले.

प्रमुख अतिथी दैनिक युवावार्ताचे संस्थापक किसन भाऊ हासे म्हणाले की, समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कारांच्या माध्यमातून सन्मानित करणे ही अत्यंत स्तुत्य बाब आहे. दिवंगत कन्या डॉ. नुसरत सय्यद यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ समाजातील विविध स्तरांतील व्यक्तींना गौरविण्याचा हा उपक्रम त्यांच्या कार्याचा आणि साहित्यसेवेचा जिवंत वारसा जपणारा आहे, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष आदिवासी सेवक बाबा खरात म्हणाले, एखादी संस्था चौदा वर्ष सामाजिक सलोखा जपून समाजातील विविध स्थरातील व्यक्तींना प्रोत्साहन देण्याकरिता झटते आणि जेष्ठ यांच्या सामाजिक,शैक्षणिक आणि इतर क्षेत्रात त्यांनी केलेल्या कामाचा गौरव करते आणि विदयार्थी यांनी मिळविलेले उत्तुंग यश यांची पाठराखण पुरस्कार देऊन करते हे कौतुकास्पद आहे म्हणून मी आयोजक यांचे आभार मानतो.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप उदमले यांनी प्रभावीपणे केले, तर बाळकृष्ण महाजन यांनी आभार मानले. हा पुरस्कार सोहळा यशस्वी करण्यासाठी संगमनेर साहित्यिक मंडळ व जवाहरलाल नेहरू उर्दू सेंटरचे अध्यक्ष शेख ईदरीस व उपाध्यक्ष सय्यद आसिफ अली व यांच्या पदाधिकारी, सदस्य आणि कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास दोन्ही संस्थांचे पदाधिकारी, सदस्य, साहित्यप्रेमी, पत्रकार, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमातून सामाजिक सलोखा, साहित्यप्रेम आणि समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींच्या कार्याचा गौरव करण्याचा प्रेरणादायी संदेश देण्यात आला.

# खुनाच्या प्रयत्नातील आरोपीची जामिनावर मुक्तता

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. १६६/२०२६ अंतर्गत खुनाचा प्रयत्न व इतर कलमांखाली दाखल गुन्ह्यातील आरोपीस मा. जिल्हा व सत्र न्यायालय, संगमनेर यांनी नियमित जामीन मंजूर केला. प्रकरणातील दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून तसेच तपासाची स्थिती, वैद्यकीय पुरावे, उपलब्ध कागदपत्रे आणि प्रकरणातील एकूण परिस्थितीचा विचार करून मा. न्यायालयाने आरोपीची पुढील कोठडी आवश्यक नसल्याचे नमूद करत योग्य त्या अटी व शर्तींसह जामीन मंजूर केला.

आरोपीतर्फे ॲड. आर. एस. राऊत यांनी प्रभावी युक्तिवाद करत आरोपीविरुद्धचा गुन्हा अद्याप न्यायालयात सिद्ध झालेला नसून, केवळ गुन्हा दाखल झाल्यामुळे कोणालाही दोषी मानता येत नाही, हा फौजदारी न्यायशास्त्राचा मूलभूत सिद्धांत न्यायालयासमोर मांडला. तसेच आरोपी तपासात पूर्ण सहकार्य करण्यास तयार असून, तो न्यायालयाने घालून दिलेल्या सर्व अटींचे पालन करेल, असा युक्तिवाद करण्यात आला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद विचारात घेऊन मा. जिल्हा व सत्र न्यायालय, संगमनेर यांनी आरोपीस नियमित जामीन मंजूर करून त्याची जामिनावर मुक्तता करण्याचा आदेश दिला.

# अंगणवाडी सेविकांना मानधन मिळण्याचा मार्ग मोकळा

अहिल्यानगर (प्रतिनिधी)-

राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाने अंगणवाडी सेविका आणि मदतनीस कर्मचाऱ्यांच्या मानधनासंदर्भात ऐक महत्त्वपूर्ण शासन निर्णय निर्गमित केला आहे. या निर्णयामुळे ओता जून २०२६ महिन्याचे मानधन व प्रोत्साहन भत्ता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. महिला व बाल विकास विभागाने काढलेल्या शासन मानधन आणि प्रोत्साहन भत्ता अदा करण्यासाठी निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. निर्णयानुसार, अंगणवाडी सेविका आणि अंगणवाडी मदतनीस यांचे जूम २०२६ या महिन्याचे शासनाने यासाठी तब्बल १७४ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. हा निधी राज्याच्या हिश्श्यातून (अतिरिक्त राज्य हिस्सा) दिला जाणार आहे.

# कंजार भाट समाजातील वैष्णवी बनली सीए

## घुलेवाडीत ग्रामस्थांकडून जाहीर सत्कार



युवावार्ता (प्रतिनिधी)

घुलेवाडी - कंजार भाट समाजातील कुमारी वैष्णवी हिने चार्टर्ड अकाउंटंट (उ-) पदवी मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले असून तिच्या या यशाबद्दल घुलेवाडी ग्रामस्थांच्या वतीने ग्रामदैवताच्या मंदिरात तिचा ज्येष्ठांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रतिकूल कौटुंबिक परिस्थितीवर मात करत मिळवलेल्या या यशामुळे ती समाजातील तसेच सर्व मुलींसाठी प्रेरणादायी ठरली आहे.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य सिताराम राऊत यांनी वैष्णवीच्या यशाचे कौतुक करताना सांगितले की, कंजार भाट समाजातील मुलींसाठी हे यश आदर्शवत असून समाज परिवर्तनाच्या प्रवासातील हा महत्त्वाचा टप्पा आहे. त्यांनी समाजातील जुन्या व मुलींसाठी घातक चालीरीतींना विरोध करून शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या समाजधुरीणांच्या प्रयत्नांचाही उल्लेख केला. वैष्णवीच्या यशामागे तिच्या कुटुंबाचा मोठा वाटा असल्याचे सांगताना त्यांनी तिचे वडील किशोर अभियेंकर यांनी प्रतिकूल परिस्थितीतही मुलींच्या शिक्षणासाठी घेतलेल्या मेहनतीचे कौतुक केले.

सत्काराला उत्तर देताना कुमारी वैष्णवी म्हणाली, माझ्या आई-वडिलांनी मला सतत पाठिंबा दिला. घुलेवाडीतील ग्रामस्थांनीही प्रोत्साहन दिले. अपयशाला न घाबरता मी माझे ध्येय निश्चित केले होते. माझ्या नावापुढे 'चार्टर्ड अकाउंटंट' लागावे हे माझे स्वप्न होते. विद्यार्थ्यांनी आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवली तर यश नक्की मिळते.

याप्रसंगी ग्रामविकास मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब राऊत, विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन भाऊसाहेब पानसरे, माजी चेअरमन बाळासाहेब कारभारी पानसरे, सखाराम महाराज तांगडे, रामनाथ महाराज राऊत, दत्तात्रय राऊत, हरिभाऊ ढमाले, विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नासिक पुणे रेल्वेसाठी मी प्रवासी सेवा संस्थेबरोबर - पद्मश्री रघुवीर खेडकर



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - प्रवाशांच्या अडचणी सोडविण्यासाठी एखाद्या गावात प्रवासी सेवा संस्था स्थापन होणे हे तिथल्या सजगतेचे लक्षण आहे. या प्रवासी सेवा संस्थेने आता संगमनेर मार्गे नासिक पुणे रेल्वेसाठी आंदोलन उभे करावे मी सर्वांच्या खांद्याला खांदा लावून आंदोलनात सहभागी होईल असे प्रतिपादन पद्मश्री रघुवीर खेडकर यांनी केले.

येथील बस स्थानकावर संगमनेर प्रवासी सेवा संस्थेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून श्री. रघुवीर खेडकर यांच्यासह ज्येष्ठ साहित्यिक आणि इतिहास संशोधक संतोष खेडलेकर, संगमनेर आगाराचे प्रमुख प्रशांत गुंड हे उपस्थित होते. डॉ. खेडलेकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, संगमनेरमध्ये सार्वजनिक प्रवासी वाहतूक सुरु झाली या घटनेला एकशे एक वर्ष पूर्ण होत असताना निरपेक्ष भावनेने हा उपक्रम होतोय ही सर्वसामान्य प्रवाशांना दिलासा देणारी गोष्ट आहे. आगारप्रमुख गुंड यांनी भविष्यात प्रवाशांना येणाऱ्या अडचणींवर तोडगा काढण्यासाठी आपण एकत्र प्रयत्न करू असे आश्वासन दिले.

प्रवासी सेवा संस्थेचे अध्यक्ष अनिल भोसले यांनी उपस्थितांचे स्वागत केले. तर कार्यक्रमाचे प्रास्तविक संस्थेचे उपाध्यक्ष संजय क्षत्रिय यांनी केले. यावेळी कारभारी देव्हारे, नितीन मोहोळे, मुरतझा बोहरी, ॲड. राजू खरे, लहानु सदगीर, अजित मणियार, विवेक मुळे, सुरेश डग, प्रशांत धाडीवाल, सचिन गणोरे, अजित काढणे, रवींद्र नवले, विनोद गायकवाड, शांताराम आडेप, सतीश आहेर, दिलीप गायकवाड, भाऊसाहेब वैद्य, सिमोन रुपटक्के, विशाल ढोरे तसेच शहरातील रिक्षा संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. शेवटी लहानु सदगिर यांनी सर्वांचे आभार मानले.

# वटपौर्णिमा म्हणजे वृक्षमैत्रीचा संदेश देणारा सण - भाऊ जाखडी



युवावार्ता(प्रतिनिधी)

'वटपौर्णिमा म्हणजे वृक्षमैत्रीचा संदेश देणारा जगातील एक अनोखा सण आहे. जो वृक्ष वाढवतो तो स्वतःच्या तसेच समाजाच्याही जीवनातील आनंद वाढवतो. आरोग्याचा स्तर उंचावतो. म्हणून वटपौर्णिमा सणाचे औचित्य साधून वृक्षारोपण मोहीम प्रत्येकाने योगदान देऊन वाढवली पाहिजे आणि भावी पिढ्यांच्या सुखी जीवनाची मुहूर्तमेढ रोवली पाहिजे 'असे प्रतिपादन पुरोहित प्रतिष्ठानचे अध्यक्ष भाऊ जाखडी यांनी येथे केले.

वटसावित्री पौर्णिमेनिमित्त रंगार गल्लीतील कासार समाज कालिका मंदिरात कासार समाज महिला मंडळाच्या सौजन्याने प्रतिष्ठानच्या वतीने महिलांसाठी वटवृक्ष पूजनाचा विधीवत सोहळा आयोजित करण्यात आला होता. वेदमंत्रांच्या घोषात शास्त्रशुद्ध रीतीने वडाची विधीवत यथासांग पूजा महिलांच्या हस्ते करण्यात आली. त्यावेळी उपस्थित भगिनींना मार्गदर्शन करताना जाखडी यांनी वरील उद्गार काढले. या सोहळ्यात कासार समाजातील महिला अनुक्रमे कासार समाज अध्यक्ष सौ स्वाती कोळपकर, संध्या भुजबळ, विद्या कोळपकर, नीलंबरी कोर्टीकर, पूजा रासने, गौरी काळे, सीमा रासने, दिपाली कोळपकर कविता रासने अनुराधा रासने रश्मी कोळकर ज्योती कोळपकर, लता कोळपकर सविता रासने सुनयना गणोरे प्रणाली गणोरे निशा गणोरे संगीता डंबिर प्रियंका गंभीर सुरेखा रासने पूजा रासने वंदना कोळपकर अशा रासने कल्पना नवले अर्चना जोशी मंगल मुळे कविता क्षीरसागर मंजू क्षीरसागर अलका क्षीरसागर सुवर्णा कोळकर श्री व सौ आहेर कल्पना राठी सुनिता कलंत्री यांच्यासह अनेक महिला सहभागी झाल्या होत्या.

'वटवृक्षाचे आरोग्याच्या दृष्टीने असलेले असंख्य फायदे अभ्यासल्या नंतर आपल्या पूर्वजांनी वटवृक्ष जतन करणे वृद्धिंगत करणे या हेतूने वटपौर्णिमा व्रताचा अंगीकार केला. सत्यवान आणि सावित्रीच्या कथेतून हाच संदेश देण्यात आला आहे की मोठ्या प्रमाणात प्राणवायू देणारा जीवदान देण्याची क्षमता असलेला हा वृक्ष मानवाला वरदान आहे. अनेक वर्षांपासून सदर उपक्रमास भगिनी मोठ्या संख्येने प्रतिसाद देतात. त्यांनी पूजन केलेले वटवृक्ष रोप त्यांच्याच हस्ते अनेक ठिकाणी लागवड करण्यात येते. त्यामुळे मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करणे सहजपणे शक्य झाले आहे. नारीशक्ती किती किमया करू शकते हे यातून दिसून आले आहे. नदी परिसरात त्यानंतर प्राथमिक स्वरूपात वृक्षारोपण करण्यात आले.

# अकोले बाजार समितीचे माजी सभापती रंगनाथ पाटील वाकचौरे यांचे निधन

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती व ज्येष्ठ नेते रंगनाथ पाटील वाकचौरे सोमवार, यांचे २९ जून रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९१ वर्षांचे होते. काही दिवसांपासून ते आजारी होते. सोमवारी दुपारी पावणेदोन वाजेच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच वीरगाव येथील निवासस्थानी नातेवाईक, मित्र, कार्यकर्ते आणि ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती.



माजी मंत्री दिवंगत मधुकरराव पिचड यांचे ते अत्यंत जवळचे मित्र होते. अकोले तालुक्याच्या राजकीय आणि सामाजिक जीवनात त्यांनी अनेक वर्षे सक्रिय सहभाग नोंदवला. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवरील आंदोलनांमध्ये ते नेहमी अग्रभागी असत. स्व. पिचड यांच्या पहिल्या निवडणुकीत त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. पंतप्रधान इंदिरा गांधी यांची भेट घेण्यासाठी पिचड गेले असताना त्यांच्यासोबत रंगनाथ पाटील वाकचौरे हेही उपस्थित होते. राजकीय निवडणुका आणि सभांमध्ये त्यांचे प्रभावी भाषण ऐकण्यासाठी मोठी गर्दी होत असे.

अगस्ती सहकारी साखर कारखाना, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी, बाजार समिती आणि खरेदी-विक्री संघ या संस्थांच्या स्थापनेत त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन मुली, जावई, सुना, नातवंडे आणि नातसुना असा मोठा परिवार आहे. त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव विलास हे राज्य बँकेत अधिकारी, संजय हे राज्य उत्पादन शुल्क विभागात पोलीस उपनिरीक्षक, तर बाबासाहेब हे अकोले तालुका खरेदी-विक्री संघाचे उपाध्यक्ष राहिले आहेत. दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

## संपादकीय...

### जागतिक क्रीडा पत्रकार दिन

# मैदानावरील संघर्ष ते समाजापर्यंतचा प्रवास

दरवर्षी २ जुलै रोजी जगभरात जागतिक क्रीडा पत्रकार दिन साजरा केला जातो. १९२४ मध्ये पॅरिस येथे स्थापन झालेल्या असोसिएशन इंटरनॅशनल द ला प्रेस स्पोर्टिव्ह (-खझड) या आंतरराष्ट्रीय क्रीडा पत्रकार संघटनेच्या स्थापनेच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा करण्याची परंपरा आहे. या दिवसाचा उद्देश क्रीडा पत्रकारांच्या कार्याचा गौरव करणे, त्यांच्या समाजातील योगदानाची दखल घेणे आणि निष्पक्ष, जबाबदार तसेच मूल्याधिष्ठित क्रीडा पत्रकारितेला प्रोत्साहन देणे हा आहे.

क्रीडा हा केवळ मनोरंजनाचा विषय नसून तो राष्ट्राच्या संस्कृतीचा, शिस्तीचा, जिद्दीचा आणि एकतेचा आरसा असतो. मैदानावर खेळाडू घाम गाळत असतात, तर त्या संघर्षाला जगासमोर पोहोचविण्याचे काम क्रीडा पत्रकार करत असतात. एखाद्या खेळाडूच्या यशामागील अथक परिश्रम, अपयशातून उभे राहण्याची ताकद आणि देशासाठी मिळवलेले यश यामागची खरी कहाणी समाजापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वाचे कार्य क्रीडा पत्रकार पार पाडतात. पूर्वी क्रीडा पत्रकारिता ही केवळ सामन्याचा निकाल, धावसंख्या किंवा गुणतालिका सांगण्यापुरती मर्यादित होती. मात्र आज तिचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. आता खेळाडूंची मानसिक तयारी, प्रशिक्षकांचे नियोजन, संघव्यवस्थापन, क्रीडा धोरणे, तांत्रिक विश्लेषण, आकडेवारी, खेळातील विज्ञान आणि अर्थकारण यांचाही अभ्यास करून सखोल वृत्तांकन केले जाते. त्यामुळे क्रीडा पत्रकार हा फक्त वार्ताहर न राहता विश्लेषक, अभ्यासक आणि समाजप्रबोधन करणारा माध्यमकर्मी बनला आहे. भारतामध्ये क्रिकेटला प्रचंड लोकप्रियता असली तरी ऑलिम्पिक, पॅरालिम्पिक, हॉकी, कबड्डी, कुस्ती, बॅडमिंटन, ॲथलेटिक्स, नेमबाजी, बुद्धिबळ यांसारख्या अनेक खेळांमध्ये भारतीय खेळाडूंनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. या यशामागील कथा लोकांपर्यंत पोहोचविण्याचे मोठे श्रेय क्रीडा पत्रकारितेलाच जाते. अनेक दुर्लक्षित खेळ आणि ग्रामीण भागातील गुणवान खेळाडूंना माध्यमांमुळेच राष्ट्रीय ओळख मिळाली आहे. डिजिटल माध्यमांच्या विस्तारामुळे क्रीडा पत्रकारितेत मोठी क्रांती झाली आहे. आता सामन्यांचे थेट प्रक्षेपण, क्षणाक्षणाचे अपडेट्स, व्हिडिओ विश्लेषण, पॉडकास्ट, ब्लॉग आणि सोशल मीडियावरील थेट संवाद यामुळे माहिती काही क्षणांत जगभर पोहोचते. मात्र या वेगवान स्पर्धेत सत्यता आणि विश्वासार्हता टिकवून ठेवणे हे सर्वात मोठे आव्हान बनले आहे. केवळ पहिली बातमी देण्याच्या स्पर्धेपेक्षा अचूक आणि पडताळलेली माहिती देणे हीच खरी पत्रकारितेची ओळख आहे. आज क्रीडा क्षेत्रात डोपिंग, सामनानिश्चिती (मॅच फिक्सिंग), आर्थिक गैरव्यवहार, संघटनांमधील राजकारण आणि निवड प्रक्रियेतील पारदर्शकतेसारखे अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. अशा वेळी निर्भीड आणि वस्तुनिष्ठ क्रीडा पत्रकारिता अधिक महत्त्वाची ठरते. चुकीच्या गोष्टींवर प्रकाश टाकतानाच प्रामाणिक खेळाडूंचे मनोबल वाढविण्याची जबाबदारीही क्रीडा पत्रकारांची असते. त्यामुळे ते केवळ खेळाचे वार्तांकन करत नाहीत, तर क्रीडा व्यवस्थेतील उत्तरदायित्वही जपतात. सोशल मीडियाच्या युगात अफवा, अप्रमाणित माहिती आणि दिशाभूल करणाऱ्या पोस्ट्स मोठ्या प्रमाणात व्हायरल होतात. अनेकदा एखाद्या खेळाडूबाबत चुकीची माहिती किंवा बनावट बातमी समाजात संभ्रम निर्माण करते. अशा परिस्थितीत विश्वासार्ह आणि अधिकृत माहिती देऊन जनतेचा विश्वास टिकवून ठेवण्याची जबाबदारी क्रीडा पत्रकारांवर अधिक वाढली आहे. वेगापेक्षा सत्याला प्राधान्य देणे, हीच आजच्या काळातील खरी पत्रकारिता आहे. भारतीय क्रीडा क्षेत्र झपाट्याने विकसित होत आहे. ऑलिम्पिकसारख्या स्पर्धांमध्ये पदकांची संख्या वाढत आहे, महिलांचा सहभाग लक्षणीय वाढत आहे आणि ग्रामीण भागातील खेळाडूही आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकू लागले आहेत. या बदलाची नोंद इतिहासात कायमस्वरूपी राहावी, यासाठी क्रीडा पत्रकारांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांच्यामुळेच समाजाला प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वे, संघर्षाच्या कथा आणि यशामागील खरे परिश्रम समजतात.

# मतदार यादी विशेष संक्षिप्त पुनरिक्षणसाठी घरोघरी भेटी - सुधीर पाटील



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - भारत निवडणूक आयोगाच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम अंतर्गत ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी भेट देऊन गणना प्रपत्र वितरित करून ते भरून घेणार आहेत. नागरिकांनी आवश्यक माहिती देऊन या प्रक्रियेस सहकार्य करावे, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी आयोजित पत्रकार परिषदेत केले.

यावेळी नायब तहसीलदार सुधीर उबाळे, नायब तहसीलदार कैलास साळुंखे आदी उपस्थित होते. श्री.पाटील म्हणाले की, २२५ अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघात एकूण ३ लाख १५ हजार २६४ मतदार असून २ लाख २४ हजार ४५२ मतदारांचे मॅपिंग पूर्ण करण्यात आले आहे. मतदार यादी विशेष संक्षिप्त पुनरीक्षणासाठी एकूण २९७ बीएलओ कार्यरत असून ३० पर्यवेक्षक नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना सहाय्य करण्यासाठी ४ सहायक मतदार नोंदणी अधिकारी आणि ३६ नव्याने सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. बीएलओंना मदतनिस म्हणून आशा सेविका व अंगणवाडी सेविकांचीही नियुक्ती करण्यात आली असून सर्व बीएलओंना २५ जून रोजी प्रशिक्षण देण्यात आले असल्याची माहिती त्यांनी दिली.

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सुरळीत होण्यासाठी विविध राजकीय पक्षांच्या ६३१ मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए) यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचे प्रशिक्षण ३० जून रोजी घेण्यात आले. बीएलओ घरी भेट देण्यासाठी आल्यानंतर नागरिकांनी आवश्यक कागदपत्रे व माहिती उपलब्ध करून देत सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमासाठी १ ऑक्टोबर २०२६ ही पात्रता तारीख निश्चित करण्यात आली आहे. २० ते २९ जून या कालावधीत आवश्यक साहित्याची तयारी, प्रशिक्षण व मुद्रण प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून ३०जून ते २९ जुलै या कालावधीत बीएलओ घराघरांत जाऊन गणना प्रपत्राद्वारे माहिती संकलित करणार आहेत.

५ ऑगस्ट २०२६ रोजी मतदार यादीचा प्रारूप (मसुदा) प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत दावे व हरकती स्वीकारल्या जातील. प्राप्त दावे व हरकतींची छाननी व निकाली काढण्याची प्रक्रिया ५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबर या कालावधीत पार पडेल. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रकाशित करण्यात येणार असल्याची माहितीही श्री.पाटील यांनी यावेळी दिली.

## लोकराजा म्हणून शाहू महाराजांची ओळख - प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे अग्रदूत असून त्यांनी समाजातील सर्वच घटकांसाठी वस्तीगृह तसेच शिक्षण क्षेत्रासाठी मोलाचे कार्य केल्याने त्यांना लोकराजा म्हणून ओळखले जाते असे गौरवउद्गार प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर यांनी शहरातील एसएमआर केबीकेएके महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित राजर्षी शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रम प्रसंगी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर यांचे हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी ज्ञानेश्वरी दीक्षित, प्रज्ञा कदम, ईश्वरी उशीर या विद्यार्थिनींनी राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवन कार्याविषयी मनोगत व्यक्त केले. डॉ. खेडेकर पुढे बोलताना म्हणाल्या की राजर्षी शाहू महाराज हे कोल्हापूर संस्थानचे पुरोगामी आणि लोक कल्याणकारी राजे होते. शेतकरी, कष्टकरी, वंचित व दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी त्यांनी अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले.शाहू महाराजांचे विचार व कार्य आजच्या पिढीने समजून घेणे ही काळाची गरज असल्याचे आवाहन यावेळी डॉ. खेडेकर यांनी उपस्थित प्राध्यापक ,शिक्षक -शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह विद्यार्थिनींना केले.

या कार्यक्रमासाठी उपप्राचार्य डॉ. नितीन सोनगीरकर,समन्वयक डॉ. सुरेश कानडे , डॉ. संजय पाबारी, ग्रंथपाल प्रा. यामिनी गालापुरे, विद्यार्थिनी सभा प्रमुख डॉ. संगीता कांबळे, राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रमुख प्रा.भारती हिंगणे, प्रा.नितीन वारे, प्रा. संध्या अदमनकर, प्रा. वैशाली गायकवाड, कार्यालयीन अधीक्षक प्रशांत आंबेकर, डॉ सतीश धनावडे, प्रा. गुलाब गायकवाड, प्रा.सिमिका मिश्रा आदींसह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नयना मनोहर म्हणून हिने केले कुमारी प्रज्ञा कदम हिने उपस्थित सर्वांचे आभार मानले.

## नामवंत ताशावादक शिंदे यांचे निधन



युवावार्ता(प्रतिनिधी)

अकोले - तालुक्यातील उंचखडक बु येथील नामवंत ताशा वादक सुरेश शंकर शिंदे (वय ५४) यांचे दि. २५ जून २०२६ रोजी ह्रदयविकाराच्या तिव्र झटक्याने निधन झाले. उंचखडक बु येथील शिंदे कुटुंब हे नगर जिल्ह्यातील पहिले संबळ ताफा असणारे कुटुंब होते. शंकर शिंदे यांच्यापासून सुरु झालेली पार्टी पुढे सुप्रसिद्ध बुलबुल, पेटी, सनई, संबळ वादक शशिकांत शिंदे यांनी कायम केली.

त्यांचे बंधू चंद्रकांत शिंदे व सुरेश शिंदे अशा तीन भावंडांनी जिल्ह्यात विविध ठिकाणी गण गवळण वाजवून रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविले. या तीन भावंडात सुरेश शिंदे हे शेवटच्या पिढीतील कलाकार होते. त्यांनी ४५ वर्षे ताशा वाजवून अनेकांचे मनोरंजन केले. सुरेश शिंदे हे असे कलाकार होते ज्यांचा लग्न साराईत एकही दिवस वादनाशिवाय जात नव्हता. त्यांना कलाकार विश्वात प्रचंड मागणी होती. शुक्रवारी ते वरात वाजवून रात्री १ वाजता उंचखडक खुर्द येथे झोपले असता त्यांना ह्रदयविकाराचा तिव्र झटका आला आणि त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा आणि एक मुलगी आहे. ते ॲड. सागर शिंदे यांचे चुलते होते.दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

# राजूर येथे वटपौर्णिमा निमित्त महिलांची गर्दी



छाया –विलास तुपे, राजूर

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - राजूर मध्ये वडाची पूजा करण्यासाठी महिलांची एकच गर्दी केली होती. हिंदू पंचांगातील ज्येष्ठ महिन्यात येणारी पौर्णिमा हा दिवस वटपौर्णिमा म्हणून साजरा केला जातो. ह्या दिवशी स्त्रिया वटपौर्णिमा नावाचे व्रत करतात. या व्रतादरम्यान विवाहित स्त्रिया आपल्या पतीला उत्तम आरोग्य लाभावे, दीर्घायुष्य प्राप्त व्हावे यासाठी महिला वडाची पूजा करतात.

ज्येष्ठ महिन्यात येणारी पौर्णिमा ही वटपौर्णिमा म्हणून साजरी मनोभावे वडाच्या झाडाची पूजा करतात. या दिवशी स्त्रिया वटसावित्री व्रत करतात. आपले पतीला उत्तम आरोग्य लाभावे दीर्घ आयुष्य प्राप्त होवे या साठी पार्थना करतात सौभाग्य चे प्रतीक मानले जाणारे हळदीकुंकू काळी पोत हिरव्या बांगड्या सौभाग्य अलंकार तेथे अर्पण करतात. फळांचा राजा आंबा हे तेथे वटवृक्षाची पूजा करताना ठेवतात. तसेच दूध साखरेचा नैवेदही दाखवतात त्यानंतर वडाच्या झाडाला सफेद दोरा गुंडाळून प्रदक्षिणा घालतात आणि शेवटी त्या धाग्याची वडाच्या खोडाला गाठ मारतात. विविध सण व उत्सव एकोप्याने उत्साहाने आनंदाने साजरी केली जातात.

**यंदाच्या वटपौर्णिमेनिमित्त एक कुटुंब - एक वडाचे झाड हा संकल्प प्रत्येकाने स्वीकारावा. लावलेल्या झाडाचे किमान तीन वर्षे संगोपन करून ते मोठे करण्याची जबाबदारीही घ्यावी. आज आपण लावलेले एक झाड उद्याच्या पिढ्यांसाठी जीवनदायी ठरणार आहे. त्यामुळे वटपौर्णिमेचा सण हा केवळ धार्मिक विधीपुरता मर्यादित न ठेवता वृक्षारोपण आणि पर्यावरण संवर्धनाचा लोकउत्सव म्हणून साजरा करण्याचे आवाहन पर्यावरण प्रेमी राहुल राऊत यांनी केले आहे.**


**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक ९३२५०२८६८६

**पाहिजेत**
मे. मोहनलाल बन्सीलाल दरडा
कॉम्प्युटर ऑपरेटर (१ जागा)
– पत्ता–
श्रद्धा फर्निचर शेजारी, अकोले रोड, संगमनेर
9822426782

**ड्रायव्हार पाहिजे**
ऑटोमॅटिक गाडीसाठी 01 जागा
मॅन्युअरल गेअर गाडीसाठी 01 जागा
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
– संपर्क –
9117175050

**पाहिजेत**
श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर्स्
श्री गणेश टायर्स
श्री गणेश ऑइल सेंटर
या फर्मसाठी
अकाऊंटंट - 2 जागा
पुरूष - टॅली आणि एक्सेलचे ज्ञान अवश्यक
कामाचा अनुभव आवश्यक
८९९९८६२७५९

**पाहिजेत**
श्रद्धा एजन्सी
ड्रायव्हर - २ जागा
जे. पी. रोड, रंगारगल्ली संगमनेर, जि. अ.नगर
— संपर्क —
9665557877

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**भाड्याने देणे**
संगमनेर बस परिसरात, नासिक- पुणे हायवे लगत ( तारा पान) च्या वर ऑफिस भाड्याने देणे आहे.
संपर्क
9922008706

**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेल
वेल्डर - 2 जागा
हेल्पर - २ जागा
7030125701
7972963397

**भाड्याने देणे आहे**
संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी
२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे
● पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन ● वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
● थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध ● व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर , जि. अ.नगर
- संपर्क -
9822258458







# सत्यशोधक विचार मंचातर्फे 'तापलेल्या पृथ्वीची गोष्ट' या विषयावर प्रा. डॉ. गुरुदास नुलकर यांचे व्याख्यान

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - वाढते तापमान, हवामान बदल, जलसंकट आणि पर्यावरणीय समतोल या अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर जनजागृती घडवून आणण्यासाठी सत्यशोधक विचार मंच, संगमनेर यांच्या वतीने व्याख्यानपुष्प मालिकेतील सातवे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. यावेळी प्रख्यात पर्यावरण अभ्यासक व विशेषतज्ज्ञ प्रा. डॉ. गुरुदास नुलकर हे 'तापलेल्या पृथ्वीची गोष्ट' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

हा कार्यक्रम रविवार, दि. ५ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता व्यापारी असोसिएशन हॉल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळ, पडतानी कॉम्प्लेक्स, संगमनेर येथे होणार असून पर्यावरणप्रेमी, विद्यार्थी, शिक्षक, शेतकरी तसेच सर्व नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

प्रा. डॉ. गुरुदास नुलकर हे महाराष्ट्रातील नामवंत पर्यावरणतज्ज्ञ, संशोधक, लेखक आणि शिक्षक म्हणून परिचित आहेत. पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकास, जलव्यवस्थापन, हवामान बदल आणि पर्यावरणीय अर्थशास्त्र या विषयांवर त्यांनी दीर्घकाळ संशोधन व जनजागृतीचे कार्य केले आहे. ते सध्या गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड



इकॉनॉमिक्सच्या सेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंटचे प्राध्यापक व संचालक असून, आयआयटी कानपूर येथे अभ्यागत प्राध्यापक म्हणूनही अध्यापन करतात.

ऑस्ट्रेलिया सरकारची प्रतिष्ठेची Endeavour Fellowship मिळालेल्या डॉ. नुलकर यांनी औद्योगिक शाश्वतता, पर्यावरण व्यवस्थापन, जलसंधारण, हवामान बदल आणि निसर्गसंवर्धन या विषयांवर अनेक पुस्तके, संशोधन निबंध आणि लेख प्रकाशित केले आहेत. त्यांच्या साहित्याला महाराष्ट्र शासनाचा सी. डी. देशमुख आर्थिक साहित्य पुरस्कार (२०१९) तसेच महाराष्ट्र साहित्य परिषदेचा साहित्य पुरस्कार प्राप्त झाला आहे. Ecological Society या संस्थेचे विश्वस्त म्हणून कार्यरत असलेले डॉ. नुलकर यांनी केंद्र सरकारच्या हरित हायड्रोजन व इतर पर्यावरणविषयक समित्यांवर तज्ज्ञ सदस्य म्हणूनही योगदान दिले आहे. पश्चिम घाट, हिमालय, महाराष्ट्रातील विविध गावे आणि नदी पुनरुज्जीवन प्रकल्पांमध्ये त्यांनी प्रत्यक्ष क्षेत्रीय काम केले असून विकास आणि पर्यावरण यांचा समतोल, स्थानिक लोकसहभागातून पर्यावरण संरक्षण, जलसंधारण आणि जैवविविधतेचे संवर्धन यासाठी ते सातत्याने कार्यरत आहेत.

पर्यावरणाचा प्रश्न हा केवळ शास्त्रज्ञांचा नसून प्रत्येक नागरिकाच्या भवितव्याशी निगडित असल्याने या व्याख्यानातून हवामान बदलाची कारणे, त्याचे परिणाम आणि त्यावरील उपाययोजनांची सखोल माहिती मिळणार आहे.

# ओबीसी विचार देशभर पोहोचवा : सपकाळ

मुंबई (वृत्तसंस्था)

ओबीसी विचार महाराष्ट्राने देशाला दिला आहे. शिव, शाहु, फुले, आंबेडकर विचार व वारकरी संप्रदायाचे तत्वज्ञान हे ओबीसी चळवळीचे दोन स्रोत आहेत आणि या विचाराचा माणूस जातीच्या पलीकडे पहात असतो. महाराष्ट्राचा हा विचार देशभर पोहचवण्याची आज नितांत गरज आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे.



प्रदेश काँग्रेसचे मुख्यालय टिळक भवन मध्ये महात्मा फुले व्दिशताब्दी जयंती निमित्त 'सत्यशोधक चळवळ' परिसंवाद व प्रज्ञावंतांचा सत्कार कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, ओबीसी विभागाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष भानुदास माळी, प्रदेश उपाध्यक्ष किशोर कन्हेरे, प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे, प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अनंत मोहोड, पनवेल जिल्हाध्यक्ष श्रुती म्हात्रे यांच्यासह शेकडो पदाधिकारी उपस्थित होते.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पुढे म्हणाले की,काँग्रेस हा सर्वांना सोबत घेऊन जाणारा पक्ष आहे म्हणूनच सर्व समाज घटकांना स्थान देण्यासाठी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी ओबीसीच्या लढ्याचा एल्गार पुकारलेला आहे. जिसकी जितनी आबादी, उतनी भागिदारी, या सुत्राने पक्ष व संघटनेत विविध समाज घटकांना स्थान दिले जात आहे. राहुल गांधी यांनी सुरु केलेला एल्गार देशभर पोहचला पाहिजे त्यासाठी सर्वांनी त्यांचे हात बळकट केले पाहिजेत, त्यांच्या मागे एक शक्ती उभी केली पाहिजे व राहुल गांधी यांनी जे स्वप्न पाहिले आहे ते पूर्ण करण्याची जबाबदारी आपल्या सर्वाची आहे, असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. ओबीसी विभागाचे उपाध्यक्ष भानुदास माळी यावेळी म्हणाले की, महात्मा फुले यांची द्विशताब्दी जयंती राज्यभर विविध कार्यक्रमाने साजरी करण्याचा निर्णय घेतलेला असून या अतंर्गत महात्मा फुलेंचा विचार महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचवण्याचा संकल्प केला आहे. महात्मा फुले द्विशताब्दी जयंती कार्यक्रमाची सांगता सभा सातारा जिल्ह्यात घेतली जाणार आहे असेही भानुदास माळी यांनी सांगितले. यावेळी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या ओबीसी विभागाचे उपाध्यक्ष भानुदास माळी यांच्यासह ओबीसी समाजाच्या नवनियुक्त सर्व पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

# आयुष्यात काही भेटी अशा असतात की ज्या कायम स्मरणात राहतात...



डॉ. नामदेवराव गुंजाळ यांचा सन्मान करतांना कुलगुरू डॉ. मोहनराव वामन

आयुष्यात अनेकदा अशा काही सुखद घटना घडतात, ज्या आपल्या मनाला दीर्घकाळ आनंद देऊन जातात. आजचा दिवस माझ्यासाठी असाच एक विशेष आणि संस्मरणीय दिवस ठरला. शिक्षण आणि पर्यावरण क्षेत्रातील दीपस्तंभ, माझे परमस्नेही आणि 'ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी'चे कुलगुरू आदरणीय डॉ. मोहन वामन सर यांची भेट घेण्याचा एक अत्यंत सुंदर योग आज योगायोगाने जुळून आला.

व्यग्र दिनचर्या आणि जबाबदाऱ्यांच्या गराड्यातही जेव्हा एखादी व्यक्ती जुन्या स्नेहाला तितक्याच आपुलकीने जपत असते, तेव्हा त्या व्यक्तीच्या मनाचा मोठेपणा दिसून येतो. आज वामन सरांची भेट झाली तेव्हा नेमका हाच अनुभव पुन्हा एकदा आला. एका अत्यंत उच्च पदावर कार्यरत असूनही, सरांच्या स्वभावातील सहजता आणि नम्रता मनाला स्पर्शून गेली. त्यांनी ज्या आदरपूर्वक आणि आपुलकीने माझे स्वागत केले,

केवळ भेटच झाली नाही, तर सरांनी अत्यंत प्रेमाने आणि आदराने माझा सन्मानही केला. हा सन्मान केवळ एका व्यक्तीचा नसून, तो आमच्यातील प्रदीर्घ, निखळ मैत्रीचा आणि परस्पर आदराचा गौरव आहे.मोहन वामन सरांसारख्या थोर शिक्षणतज्ज्ञ, वनस्पतीशास्त्रज्ञ आणि संवेदनशील व्यक्तिमत्त्वाकडून मिळालेला हा सत्कार माझ्यासाठी अत्यंत मोलाचा आणि अभिमानास्पद आहे. या भेटीदरम्यान झालेल्या गप्पांमधून सरांचे शिक्षण क्षेत्रातील दूरगामी व्हिजन आणि समाजाप्रती असणारी कृतज्ञतेची भावना पुन्हा एकदा जवळून अनुभवता आली.

पदे येतात आणि जातात, पण माणसाने जपलेला जिव्हाळा आणि आपुलकी कायम राहते, याचे उत्तम उदाहरण म्हणजेच वामन सर आहेत. माझ्यासारख्या स्नेहाचा सन्मान केल्याबद्दल मी आदरणीय मोहन वामन सरांचे मनापासून आभार मानतो. धन्यवाद सर! आपला हा स्नेह आणि आपले मार्गदर्शन आगामी काळातही असेच कायम राहो, हीच सदिच्छा. सरांना त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी आणि शैक्षणिक कार्यातील नवनवीन शिखरे सर करण्यासाठी माझ्याकडून मन:पूर्वक शुभेच्छा!

धन्यवाद....!






# पुणे -नाशिक रेल्वेसाठी मुख्यमंत्र्यांशी चर्चा - ना. विखे

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - पुणे हायस्पीड रेल्वे मार्ग आणि राहुरी शनिशिंगणापूर रेल्वे प्रश्नाच्या संदर्भात नाशिक, अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यातील संबंधित लोकप्रतिनिधींचे शिष्टमंडळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेवून त्यांच्याकडे चर्चा करणार आहे. केंद्र शासनाच्या स्तरावर पाठपुरावा करून याबाबत यशस्वी तोडगा काढण्यासाठी निश्चित प्रयत्न करण्यात येतील, असे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विधानभवनात आयोजित बैठकीत सांगितले.

नाशिक - पुणे हायस्पीड रेल्वे मार्गाबाबत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस आमदार सर्वश्री माणिकराव कोकाटे, शरद सोनवणे, बाबाजी काळे, विठ्ठल लंघे, शिवाजी आढळराव पाटील, सत्यजित तांबे, प्राजक्ता तनपुरे, अमोल खताळ, अक्षय कर्डिले उपस्थित होते. तर माजी मंत्री आमदार दिलीप वळसे पाटील यांनी दूरदृष्य प्रणाली द्वारे बैठकीत सहभाग घेतला.

मंत्री श्री विखे पाटील म्हणाले, केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या सोबतही या रेल्वे मार्गाबाबत चर्चा करण्यात येईल. त्यासाठी संबंधित लोकप्रतिनिधींचे शिष्टमंडळही दिल्लीला जाऊन त्यांची भेट घेईल. हा रेल्वे मर्ग नाशिक,



अहिल्यानगर व पुणे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. या रेल्वे मार्गामुळे एक वेगवान संपर्क जोडणी पुणे ते नाशिक या दोन महानगरा दरम्यान निर्माण होईल. त्यामुळे राज्याचाही गतीने विकास होईल. पुणे नासिक हायस्पीड रेल्वे प्रकल्पाच्या बाबतीत जनतेच्या भावना विचारात घेवून या प्रश्नाबाबत सकारात्मक निर्णय व्हावा यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

राहुरी शनिशिंगणापूर रेल्वे मार्गाच्या संदर्भात असलेल्या या रेल्वे मार्गाच्या बाबतीत बैठकीत चर्चा झाली.या प्रश्नाबाबत शेतकर्याच्या असलेल्या भावना मुख्यमंत्र्याच्या निदर्शानास आणून देणार असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले. माजी मंत्री आ.दिलीप वळसे पाटील यांनी बैठकीत सहभाग घेताना सांगितले की,पुणे नासिक रेल्वे प्रकल्पाच्या संददर्भात केंद्रीय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांच्याशी चर्चा केली असून जीएमआरटीच्या अडचणी दूर होवू शकतात ही बाब त्यांच्या निदर्शानास आणून दिली आहे.काही देशांमध्ये आशा पध्दतीच्या अडचणी असताना रेल्वे मार्गाची काम झाली असल्याचा दाखला देवून यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा लागेल.मुख्यमंत्र्याच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ नेण्याची सूचना त्यांनी केली.

# ...ही देखील एक प्रथा सुरू करावी !

## आजपासून... आत्तापासून... हॉस्पिटल = लिफाफा

लग्न... मंडप सजलेला असतो. सनईचे सूर घुमत असतात. नवरी नटून थटून बसलेली असते. आपण मोठ्या तोऱ्यात जातो. खिशातला लिफाफा काढतो.

नव्या संसाराला हातभार म्हणून ५००, १०००, ५००० रुपये हसतमुखाने देतो. फोटो काढतो. स्टेटस ठेवतो. किती भारी आहेर दिला याची चर्चा चार दिवस रंगते.

पण...पांढऱ्या भिंती. औषधांचा दर्प.

आयसीयू बाहेर एक बाई भिंतीला टेकून बसलेली असते. तिची ओटी रिकामी, कपाळावरचं कुंकू पुसट होत चाललंय. नवऱ्याचा श्वास नळीतून चाललाय. डॉक्टर दर २ तासांनी बाहेर येतात आणि एकच वाक्य बोलतात: बिल भरलं का?

तिच्या पोरगं मेडिकलच्या काऊंटरवर उभं राहतं. हातात चिठ्ठी असते: इंजेक्शन ८००० रुपये. खिशात फक्त २०००. तो गपचूप मागे फिरतो. इंजेक्शन न घेताच. बाप आत तडफडतोय आणि पोरगं बाहेर लाचार उभं आहे.

घरातलं मंगळसूत्र केव्हाच विकलं गेलंय.

बहिणीच्या लग्नासाठी ठेवलेली एफडी मोडली गेलीय.

शेजाऱ्यांकडे, नातेवाईकांकडे हात पसरून झाले.

आता फक्त डोळ्यात पाणी आणि ओठावर एकच प्रार्थना: देवा, वाचव रे माझ्या माणसाला.

आणि अशा वेळी आपण जातो...

हातात दोन सफरचंद. टेबलावर ठेवतो आणि म्हणतो, काळजी करू नकोस, सगळं ठीक होईल. काही लागलं तर बिनधास्त सांग.

खरंच? बिनधास्त सांगू?

वहिनी, ५० हजार कमी पडतायत, द्याल का? असं विचारायची हिंमत आहे का तिच्यात? नाही. ती फक्त मान डोलावते आणि आतल्या आत मरते.

आपण निघून येतो. गाडीत बसतो.

बिचारी म्हणून एक सुस्कारा टाकतो.

आणि घरी येऊन जेवण करतो.



पण तिचं जेवण?

तिच्या पोरांचं जेवण?

हॉस्पिटलच्या बिलाने त्यांच्या ताटातला घास हिरावून घेतलाय. जिथे ढोल ताशे आहेत, तिथे आपण लाखो उधळतो. आणि जिथे व्हेंटिलेटरचा 'बीप बीप' आवाज येतोय, मृत्यू दारात उभा आहे, तिथे आपण १०० रुपये द्यायलाही दहा वेळा विचार करतो.

ही कुठली माणुसकी? ही कुठली रीत?

आज शपथ घ्या...

पुढच्या वेळी कुणी आजारी असेल, हॉस्पिटलमध्ये असेल, तर रिकाम्या हाताने जायचं नाही.

लिफाफा न्यायचाच. १०० रुपये असले तरी चालतील. कारण तो लिफाफा नसतो... तो 'श्वास' असतो. तू लढ, मी आहे सोबत हा दिलासा असतो.

कदाचित तुमच्या त्या लिफाफ्यामुळे...

एका बापाला त्याची पोरं पुन्हा बाबा म्हणू शकतील. एका नवऱ्याला त्याची बायको पुन्हा अहो म्हणू शकेल. एका पोराला त्याची आई पुन्हा जेवू घालू शकेल.

लग्नातला आहेर लोक विसरतात हो... पण स्मशानाच्या वाटेवरून परत आणणारा आधार, माणूस मेल्यावरही विसरत नाही.

ही प्रथा सुरू करा.

कारण उद्या काळाने घाला घातला आणि तुमचाच माणूस त्या बेडवर असेल... तेव्हा तुम्हाला कळेल की **'Get Well Soon'** च्या कार्डापेक्षा ५०० च्या नोटेची किंमत काय असते.

आजपासून... आत्तापासून...

हॉस्पिटल = लिफाफा.

हीच खरी माणुसकीची प्रथा.

वाचून डोळे पाणावले असतील तर नक्की शेअर करा. कारण तुमच्या एका शेअरमुळे कुणाच्यातरी घरचा दिवा विझायचा थांबेल...

लग्नातला आहेर मिरवला जातो,

आजारपणातला आधार जपला जातो.

कारण मृत्यूच्या दारात उभा असताना,

माणूसच माणसाचा देव असतो.

# व्हेनेझुएलामधील भारताची मदत मोहीम अधिक तीव्र

## चोवीस तास मोफत वैद्यकीय सेवा सुरू

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

ऑपरेशन 'अमिस्ताद' अंतर्गत भूकंपग्रस्त व्हेनेझुएलामध्ये तैनात भारतीय लष्कराचे फील्ड हॉस्पिटल पूर्ण क्षमतेने कार्यरत झाले असून ते चोवीस तास मोफत वैद्यकीय सेवा देत आहे.

व्हेनेझुएलातील भारतीय दूतावासाने दिलेल्या माहितीनुसार, अनुभवी डॉक्टरांच्या भारतीय वैद्यकीय पथकाने काराकास येथील आंतरराष्ट्रीय ला रिंकोनाडा रेसट्रॅक येथे वैद्यकीय छावणी उभारली आहे. सोमवारी या छावणीने पूर्ण क्षमतेने काम सुरू केले असून सर्व वैद्यकीय सेवा नागरिकांना विनामूल्य उपलब्ध करून दिल्या जात आहेत.परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले की, भारतीय लष्कराचे फील्ड हॉस्पिटल भूकंपग्रस्तांना पूर्ण क्षमतेने वैद्यकीय मदत पुरवत आहे. भारतीय हवाई दलाच्या माहितीनुसार, ऑपरेशन 'अमिस्ताद' अंतर्गत सी-१७ ग्लोबमास्टर या दोन मालवाहू विमानांद्वारे व्हेनेझुएलामध्ये ६६ टन मदतसामग्री पोहोचवण्यात आली आहे. यामध्ये भारतीय लष्कराचे फील्ड हॉस्पिटल, ३५ टनांहून अधिक मदतसाहित्य, औषधे, वैद्यकीय उपकरणे आणि दोन 'भीष्म क्यूब्स' यांचा समावेश आहे. 'सहयोग, हित आणि मैत्री' (भीष्म) क्यूब्स ही भारताची आरोग्यविषयक आपत्कालीन पुढाकार असून, ही अत्याधुनिक मोबाईल रुग्णालये आहेत. आपत्तीच्या काळात तातडीच्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणे हा त्यांचा मुख्य उद्देश आहे.गेल्या बुधवारी सायंकाळी व्हेनेझुएलामध्ये ७.२ आणि ७.५ रिश्टर तीव्रतेचे दोन शक्तिशाली भूकंप झाले. हे भूकंप गेल्या शंभरहून अधिक वर्षांतील सर्वाधिक तीव्र भूकंपांपैकी एक मानले जात आहेत. रविवारी मृतांचा आकडा १,७०० वर पोहोचला असून हजारो जण जखमी झाले आहेत, तर अनेक नागरिक अद्याप बेपत्ता आहेत.

# जनरल द्विवेदी निवृत्त; धीरज सेठ नवे लष्करप्रमुख

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

भारतीय लष्कराचे प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी मंगळवारी आपल्या पदावरून निवृत्त झाले. निवृत्तीपूर्वी त्यांनी नवी दिल्लीतील राष्ट्रीय युद्ध स्मारकावर जाऊन शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी त्यांनी आपल्या कार्यकाळातील लष्कराच्या कामगिरीचा आढावा घेत नव्या नेतृत्वाला शुभेच्छा दिल्या.

जनरल द्विवेदी म्हणाले की, गेल्या २ वर्षांत भारतीय लष्कराने प्रत्येक आघाडीवर सज्जता, संतुलन आणि सतर्कता कायम ठेवली. ऑपरेशन सिंदूर हे या तयारीचे महत्त्वपूर्ण उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच उत्तर सीमेवरील ऑपरेशन स्नो लेपर्ड अंतर्गत भारतीय लष्कराची तैनाती पूर्ण ताकदीने आणि उच्च सतर्कतेसह करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पश्चिम सीमेवरही सैन्याने संयम आणि जबाबदारीने आपली भूमिका बजावल्याचे त्यांनी नमूद केले.राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित प्रत्येक प्रकरणात भारतीय लष्कराने स्पष्ट उद्दिष्ट, शिस्त आणि जबाबदारीच्या भावनेने कर्तव्य बजावले असून, या काळात भूदल, नौदल आणि वायुदल यांच्यातील समन्वय अधिक बळकट झाल्याचे त्यांनी सांगितले. तिन्ही दलांनी समान दृष्टिकोन, परस्पर विश्वास आणि उत्कृष्ट समन्वयाने कार्य केले, असेही ते म्हणाले.वास्तविक नियंत्रण रेषेवरील (एलएसी) परिस्थिती सध्या स्थिर असली तरी संवेदनशील असल्याचे सांगत जनरल द्विवेदी यांनी भारतीय लष्कर कोणत्याही आव्हानाला किंवा आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी पूर्णपणे सज्ज असल्याचा विश्वास व्यक्त केला.

ताम्हाणे हॉस्पिटल
पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५० संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर



# दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com



आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०







# अखेर अनेक वर्षांच्या पाठपुराव्याला यश

## संगमनेरमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यासह डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भव्य स्मारकाचा मार्ग मोकळा

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर -

संगमनेर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्यासह भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारक उभारणीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. नगर परिषदेकडून या दोन्ही महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसाठी अधिकृत निविदा प्रसिद्ध करण्यात आल्याने शहरातील शिवभक्त, सामाजिक कार्यकर्ते तसेच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष आणि शिवजयंती उत्सव युवक समितीमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



गेल्या अनेक वर्षांपासून संगमनेरमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्याची मागणी सातत्याने होत होती. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष, शिवजयंती उत्सव युवक समिती आणि विविध शिवप्रेमी संघटनांनी वेळोवेळी निवेदने देत या मागणीचा पाठपुरावा केला होता. अखेर या प्रयत्नांना यश मिळाल्याने संबंधितांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

नगर परिषदेच्या नियोजनानुसार, संगमनेर बसस्थानक परिसरातील प्रस्तावित चौथऱ्यावर ब्राँझ गनमेटल धातूपासून सुमारे १५ फूट उंचीचा छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात येणार आहे. तसेच शिवाजी चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विद्यमान पुतळ्याच्या ठिकाणी १२ फूट उंचीचा पूर्णाकृती ब्राँझ गनमेटल पुतळा साकारण्यात येणार आहे. या महत्त्वाच्या प्रकल्पासाठी नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे यांनी विशेष पुढाकार घेतला असून, मुख्याधिकारी दयानंद गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर नगर परिषदेकडून अधिकृत निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. हे दोन्ही स्मारक शहराच्या वैभवात भर घालण्याबरोबरच ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक वारशाचे प्रतीक ठरणार असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. या निर्णयाबद्दल शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख अमर कतारी यांनी समाधान व्यक्त करत नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे, आमदार सत्यजित तांबे, आमदार अमोल खताळ, माजी मंत्री बाळासाहेब थोरात तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले.

यावेळी शहरप्रमुख अमित चव्हाण, फैसल सय्यद, पप्पू कानकाटे, तालुकाप्रमुख भीमाशंकर पावसे, युवासेना जिल्हाप्रमुख अक्षय गुंजाळ, अमोल डुकरे, शिवजयंती उत्सव युवक समितीचे पदाधिकारी, सदस्य आणि शिवभक्तांनी या निर्णयाचे स्वागत करत आनंद व्यक्त केला. आवश्यक असल्यास ही बातमी आणखी वृत्तपत्रीय शैलीत, अधिक धारदार मथळ्यासह किंवा ब्रेकिंग न्यूज स्वरूपातही तयार करून देऊ शकतो.

# डॉक्टर्स डे निमित्त इनरव्हील क्लब ऑफ संगमनेरतर्फे

## के.एम. हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांचा सन्मान



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आंतरराष्ट्रीय डॉक्टर्स डे निमित्त इनरव्हील क्लब ऑफ संगमनेर यांच्या वतीने के. एम. हॉस्पिटल, संगमनेर येथे आरोग्य सेवा देणाऱ्या डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला. समाजाच्या आरोग्यसेवेत अहोरात्र योगदान देणाऱ्या डॉक्टरांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी क्लबच्या अध्यक्षा वैशाली चोपडे होत्या. यावेळी सचिव अश्विनी ढोले, सी.सी. ममता पोफळे, आय.एस.ओ. अश्विनी राठी, खजिनदार प्रियांका शहा, एडिटर सप्तसिंधू खोसे, क्लब ई-ॲडमिन पूजा हासे तसेच उपाध्यक्षा दीपमाला भोत, शिला करंजेकर उपस्थित होत्या.

यावेळी के. एम. हॉस्पिटलचे डॉ. महेश वाव्हळ, डॉ. सुशांत गिते, डॉ. संदीप बोरले, डॉ. राज म्हस्के, डॉ. सुवर्णा मेहत्रे, डॉ. बाळासाहेब मेहत्रे, डॉ. सखाराम घनकुटे, डॉ. रूपाली शिंदे, डॉ. सोनाली गिते, डॉ. स्वाती म्हस्के, डॉ. कोमल बोरले, डॉ. राजगोपाल तिपाले, डॉ. गणेश नागुलकर, डॉ. कैलास मांडे, डॉ. अभिजीत आंबुलकर व डॉ. समीक्षा वर्पे यांचा पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

या प्रसंगी डॉ. संदीप बोरले, डॉ. सोनाली गिते आणि डॉ. रूपाली शिंदे यांनी मनोगत व्यक्त करत डॉक्टरांच्या सामाजिक जबाबदारीबरोबरच अशा सन्मानामुळे मिळणाऱ्या प्रेरणेचे महत्त्व अधोरेखित केले. इनरव्हील क्लबने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे त्यांनी कौतुक करत समाज आणि वैद्यकीय क्षेत्र यांच्यातील स्नेहबंध अधिक दृढ होण्यास अशा कार्यक्रमांची आवश्यकता असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूजा हासे यांनी केले. उपस्थित डॉक्टरांनी आणि क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी परस्पर संवाद साधत आरोग्यविषयक जनजागृतीसाठी भविष्यातही संयुक्त उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला.

# रतनगडावर अश्लील रील बनवणे भोवले

## पूर्णिमा जाधव आणि स्वप्नील शिवलकरवर गुन्हा दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - ऐतिहासिक रतनगड किल्ल्यावर अश्लील चित्रीकरण (रील) करून गडाचे पावित्र्य भंग केल्याप्रकरणी सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर पूर्णिमा जाधव आणि स्वप्नील शिवलकर यांच्याविरोधात अखेर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रतनवाडी येथील रहिवासी भरत झडे यांनी दिलेल्या अधिकृत फिर्यादीवरून राजुर पोलीस ठाण्यात हा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पूर्णिमा जाधव आणि स्वप्नील शिवलकर यांनी रतनगडाच्या पवित्र परिसरात अश्लील आणि आक्षेपार्ह हावभाव करत व्हिडिओ शूट केले होते. हे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर शिवप्रेमी आणि स्थानिक ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप उसळला होता. ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा असलेल्या गडावर अशा प्रकारची हुल्लडबाजी खपवून घेतली जाणार नाही, अशी भूमिका स्थानिकांनी घेतली. त्यानुसार रतनवाडीचे रहिवासी भरत झडे यांनी राजुर पोलीस स्टेशन गाठून याप्रकरणी रीतसर तक्रार दिली.

भरत झडे यांच्या फिर्यादीची गंभीर दखल घेत राजुर पोलिसांनी पूर्णिमा जाधव आणि स्वप्नील शिवलकर यांच्यावर सार्वजनिक ठिकाणी अश्लीलता पसरवणे, ऐतिहासिक वास्तूचा अवमान करणे आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पोलीस प्रशासनाने या प्रकरणाचा पुढील तपास सुरू केला असून, गडकिल्ल्यांवर अशा प्रकारे हुल्लडबाजी करणाऱ्यांना हा एक मोठा इशारा मानला जात आहे.


नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165



सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता



चैतन्य हॉस्पिटल
मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी
अंतर्गत अर्थसहाय्य देण्यात येणारे आजार
● हृदयरोग (Heart Diseases)
● मेंदूरोग (Brain Diseases)
● कर्करोग शस्त्रक्रिया
● अपघात (Accident)
● लहान बालकांची शस्त्रक्रिया
● गुडघ्याचे प्रत्यारोपण
● विद्युत अपघात रुग्ण
● कर्करोग (केमोथेरपी रेडिएशन)
● डायलिसिस
● अपघात शस्त्रक्रिया
● खुबा प्रत्यारोपण
● मेंदूत रक्तस्त्राव होणे / मेंदूत रक्त गोठणे.
२४ तास सुविधांसाठी
०२४२५ - २२४७६२
मोबा. ७०३०२७०३८२
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर






अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
♦ मासिक पाळीच्या तक्रारी ♦ योनी मार्गाची दुर्गंधी
♦ अंगावरून पांढरे जाणे ♦ गुप्त अंगाला खाज
♦ गर्भ न रहाणे ♦ विविध त्वचा विकार
♦ वारंवार गर्भपात होणे ♦ गुप्तरोग, गर्मी
♦ गर्भाशयात गाठी ♦ लघवीला जळजळ
♦ गर्भाशयाचा कर्करोग ♦ संभोगात रस न येणे
♦ स्तनांची वाढ न होणे ♦ संभोगा विषयीची भीती
♦ स्तनातून दूध न येणे ♦ हस्तमैथुनाची सवय
♦ स्तनात गाठी ♦ लैंगिक विकृती
♦ स्तनाचा कर्करोग ♦ मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
(३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव)
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार | ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13



स्वास्थ्य रक्षणाय रोग परिशमनाय
KH
कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25